मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नदी सुशोभीकरणापेक्षा प्रदूषणमुक्तीला प्राधान्य

## मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती, स्वतंत्र 'नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' लवकरच...

**पिंपरी | प्रतिनिधी**

'एक वेळ नदी सुशोभित केली नाही तरी चालेल. मात्र, ती प्रथम प्रदूषणमुक्त झालीच पाहिजे,' अशी स्पष्ट भूमिका राज्याच्या पर्यावरण आणि वातावरण बदलमंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली.

राज्यातील वाढते जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केवळ नदी पुनरुज्जीवनावर लक्ष केंद्रित करणारे स्वतंत्र 'नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याची घोषणाही मुंडे यांनी केली.




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मुख्यालयात पंकजा मुंडे यांनी शुक्रवारी बैठक घेतली. त्या वेळी त्या बोलत होत्या. तत्पूर्वी, मुंडे यांनी तळवडे येथील रॉ वॉटर पंपिंग स्टेशन आणि इंद्रायणी नदीची सद्यःस्थिती, तसेच रावेत येथील पंपिंग स्टेशन आणि पवना नदीतील प्रदूषणाची पाहणी केली.

आमदार महेश लांडगे, उमा खापरे आणि शंकर जगताप, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौर रवी लांडगे, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाचे सहसचिव रमेश मनाले, 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त के. मंजूलक्ष्मी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी संस्था आणि उद्योगांकडून सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट नदीपात्रात सोडले जात असल्याने प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाल्याचे पंकजा मुंडे यांनी नमूद केले. त्या म्हणाल्या, 'अनेक उद्योगांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारले जातात. मात्र, योग्य देखभालीअभावी ते बंद पडतात. यापुढे अशा उद्योगांवर केवळ नोटीस न बजावता थेट व कठोर कारवाई केली जाईल.

'पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांनी नदीपात्रातील अतिक्रमणे तातडीने काढावीत,' अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी केली. 'प्रत्येक गृहनिर्माण संस्थेत 'एसटीपी' सक्तीचा करावा आणि हद्दीतील प्रत्येक नाला 'एसटीपी'ला जोडून केवळ प्रक्रिया केलेलेच पाणी नदीत जाईल, याची काटेकोर दक्षता घ्यावी,' असे आदेशही मुंडे यांनी दिले.

दरम्यान, 'या बैठकीत जलप्रदूषणासोबतच वाढत्या वायुप्रदूषणाच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. बांधकामाच्या ठिकाणी इमारती योग्य प्रकारे झाकल्या न गेल्याने हवेतील धुलिकणांचे प्रमाण वाढते. त्यामुळे अशा उघड्यावर सुरू असलेल्या बांधकामांना तत्काळ नोटिसा बजावून हवेतील प्रदूषण कमी करावे,' असे मुंडे यांनी स्पष्ट केले.

# मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन सक्तीच्या रजेवर

## पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेमधील तब्बल ५२ कोटी रुपयांच्या आर्थिक प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केला असून, या प्रकरणाची सखोल





चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे.

आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी आदेशात म्हटले आहे की, सन २०२५-२६ आणि २०२६-२७ च्या अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये बदल करून करण्यात आलेल्या बिल अदायगी तसेच मागील तीन वर्षांतील तत्सम प्रकरणांची चौकशी केली जाणार आहे. चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रवीण जैन यांना तात्काळ प्रभावाने सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. तसेच, त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले यांच्याकडे सोपविण्यात आला आहे

प्रशासनाकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घडामोडींमुळे महापालिकेत एकच खळबळ उडाली असून, पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अनधिकृत बांधकाम प्रकरणी तीन अधिकाऱ्यांवर कारवाई; दोघे निलंबित

## गोपनीय माहिती लीक व कारवाईकडे दुर्लक्ष; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे कडक आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

अनधिकृत बांधकामांवरील कारवाईकडे दुर्लक्ष, अतिक्रमण कारवाईची गोपनीय माहिती लोकांना पुरविणे सहायक आयुक्त, कनिष्ठ अभियंता आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाला (बीट निरीक्षक) चांगलेच भोवले आहे. सहायक आयुक्ताला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाला निलंबित केले असून दोघांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

अनधिकृत बांधकामांवरील कारवाईकडे दुर्लक्ष केल्याने 'ई' क्षेत्रीय अधिकारी असलेले सहायक आयुक्त तानाजी नरळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण कारवाईसाठी नरळे यांना प्राधिकृत केले आहे. परंतु, त्यांनी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण कारवाईकडे दुर्लक्ष केले. अनधिकृत बांधकामावरील कारवाई संदर्भात फेब्रुवारी २०२६ पासून दर महिन्याला आढावा बैठक घेण्यात येत आहे. 'ई' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील ५६२ अनधिकृत बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. प्रत्यक्षात केवळ ८२ ठिकाणीच अतिक्रमण कारवाई करण्यात आली. ४८० बांधकामांना नोटीस देऊन कोणतीही कारवाई केली नाही. यातून कारवाईबाबतची उदासीनता दिसून येत आहे. अनधिकृत बांधकामावरील कारवाईचे, प्रस्तावित कारवाईचे विवरण सादर करणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष केले. ही बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे निरीक्षण नोंदवून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत नरळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. शिस्तभंग विषयक कारवाई का करण्यात येऊ नये? याचा लेखी खुलासा तीन दिवसांत सादर करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.



### अनधिकृत बांधकामांना नोटिसा देण्याकडे दुर्लक्ष

**» स्थापत्य अभियांत्रिकी सहायक शेषेराव अटकोरे यांना निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. अटकोरे हे बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे 'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील प्रभाग क्रमांक २९ पिंपळेगुरव या परिसरातील अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, वाढीव बांधकामांचे सर्वेक्षण करून अहवाल देणे, अनधिकृत बांधकामांना नोटीस देणे, पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून कारवाई करण्याची जबाबदारी आहे. असे असताना अटकोरे यांनी अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई केली नाही. सर्वेक्षण केले नाही. अनधिकृत बांधकामांना नोटिसा दिल्या नाहीत. त्यामुळे अनधिकृत बांधकामांमध्ये मोठी वाढ झाली असून तक्रारीही वाढल्या आहेत. याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली असता कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे कामकाजात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत अटकोरे यांना निलंबित केले असून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.**

### कारवाईची 'टीप' दिल्याने निलंबित

**» कनिष्ठ अभियंता संदीप हजारे यांना निलंबित करून विभागीय चौकशी सुरू केली आहे. हजारे हे स्थापत्य मुख्य कार्यालयात कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे, सर्वेक्षण करून अहवाल सादर करणे, अनधिकृत बांधकामांना नोटीस देणे, पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून कारवाई करण्याची जबाबदारी आहे. या हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर एक एप्रिल रोजी सर्व साहित्य सामुग्रीसह पोलीस बंदोबस्तमध्ये कारवाईचे नियोजन केले होते. मात्र, कारवाईच्या आदल्या दिवशी ३१ मार्च रोजी हजारे यांनी अतिक्रमण कारवाईची गोपनीय माहिती लोकांना पुरविली. त्यामुळे कारवाईत अडथळा आला. प्रचंड दबाव निर्माण झाला. याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावली असता हजारे यांनी कोणताही खुलासा केला नाही. त्यामुळे गोपनीयतेचा भंग केल्याचा ठपका ठेवत हजारे यांना निलंबित केले आहे. त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.**

# डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलचा मोशी येथे अत्याधुनिक नेत्ररुग्णालयाचे उद्घाटन

## नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज मोशी येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्‌घाटन केले. पुणे महानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

उद्‌घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल.



या केंद्राचे उद्‌घाटन पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर श्री. नितीन काळजे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

४,२०० चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (LASIK), कॉर्निया, ग्लॉकोमा, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार परिणाम सुनिश्चित केले जातील.



डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, "डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. मोशी केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागा तील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे."

श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले, "आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे."

# उशिरा पावसाच्या शक्यतेमुळे पुण्यात पाणी नियोजनाला गती

## महापालिकेकडून कपातीचे पर्याय तयार; अंतिम निर्णय आयुक्त व सर्वसाधारण सभेत

**पुणे | प्रतिनिधी**

यंदाच्या वर्षी पावसाला उशिरा सुरुवात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने धरणात उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. महापालिकेला मंजूर असलेला पाण्याचा साठा अधिकाधिक काळ टिकावा, यासाठी आठवड्यातून एक दिवस किंवा दिवसाआड पाणीकपात केल्यास किती पाण्याची बचत होईल, याचा सविस्तर प्रस्ताव तयार करून हे दोन्ही प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविण्याचा निर्णय पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे.

महापालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 'पाणीकपात करायची झाल्यास त्या बाबतचा निर्णय तातडीने घेणे अशक्य आहे. त्यामुळे याचे नियोजन सुरू करण्यात आले असून, दोन प्रस्ताव तयार करून ते आयुक्तांकडे पाठविले जाणार आहेत. आयुक्तांच्या आदेशानंतर महापालिकेतील लोकप्रतिनिधींसमोर वस्तुस्थिती मांडून सर्वसाधारण सभेत या बाबतचा अंतिम निर्णय होईल.'




### आयुक्त नवल किशोर राम यांचे संकेत

» **महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्याची गरज अधोरेखित केली आहे. पावसाळा उशिरा येण्याची शक्यता आणि 'एल निनो' चा प्रभाव लक्षात घेता धरणातील पाणीसाठा जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना राबवून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले**

यंदा 'एल निनो' च्या प्रभावामुळे पाऊस कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत राखीव ठेवण्याची सूचना उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी जलसंपदा विभागाला केली आहे.

तसेच, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीदेखील स्पष्ट सूचना जलसंपदा विभागाला दिल्या आहेत. पावसाळा सुरू होईपर्यंत पाण्याची गरज भागविण्यासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने पुढील काही महिने १५ टक्के पाणीकपात करावी, अशी नोटीस जलसंपदा विभागाने महापालिकेला बजाविली आहे.

महापालिकेला नोटीस देण्यात आल्यानंतर त्यावर उलटसुलट चर्चा सुरू झाल्या. 'कितीही नोटीस आल्या तरी पुणेकरांचा एक थेंब देखील कमी होऊ देणार नाही,' अशी भूमिका स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी घेतली आहे. तर पाण्याचे नियोजन करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सुतोवाच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केले आहेत.

पुणे शहराला खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. महापालिका प्रतिदिन १ हजार ५६० दशलक्ष लिटर पाणी धरणांतून घेते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा धरणात पाण्याचा साठा काही प्रमाणात अधिक आहे. मात्र, पावसाळा उशिरा सुरू होण्याचा अंदाज व्यक्त केला जात असल्याने त्याचे नियोजन पाणीपुरवठा विभागाकडून केले जात आहे.

### नंदकिशोर जगताप यांची माहिती

» **महापालिकेचे पाणीपुरवठा विभाग प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले की, संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन नियोजन सुरू करण्यात आले आहे. आठवड्यातून एक दिवस किंवा दिवसाआड पाणीकपात केल्यास किती बचत होईल, याचा सविस्तर अभ्यास केला जात आहे. त्यानुसार दोन स्वतंत्र प्रस्ताव तयार करून ते आयुक्तांकडे सादर केले जाणार आहेत. आयुक्तांच्या निर्देशानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल.**

### श्रीनाथ भिमाले यांची ठाम भूमिका

» **स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पाणी कपातीला स्पष्ट विरोध दर्शविला आहे. 'कितीही नोटिसा आल्या तरी पुणेकरांचा एक थेंबही पाणी कमी होऊ देणार नाही,' अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. शहरातील अनेक भागांत आधीच अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने कपात केल्यास नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल, असेही त्यांनी नमूद केले.**

# पुण्यातील पाषाण तलावातील मासे मृत्यू प्रकरणी महापालिका आयुक्तांची मोठी कारवाई!

## सांडपाणी थेट तलावात सोडल्याने पर्यावरणास धोका; आयुक्त नवल किशोर राम यांची कठोर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

पाषाण तलावातील मासे आणि इतर जलचरांच्या मृत्यू झाल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणाची गंभीर दखल महापालिका प्रशासनाने घेतली आहे. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करत महापालिका आयुक्तांकडून या प्रकरणांमध्ये पालिकेतील चार अधिकाऱ्यांवर थेट निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.



पाषाण तलावाजवळ असलेला एक एमएलडी क्षमतेचा मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) योग्यरीत्या कार्यरत नव्हता. परिणामी, प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट तलावात सोडले जात होते. त्यामुळे पाषाण तलावातील मासे व इतर जलचरांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे केवळ पर्यावरणालाच हानी पोहोचली नाही, तर आसपासच्या परिसरातील सार्वजनिक आरोग्यालाही धोका निर्माण झाला होता.

भाषांतलावातील माशांचा यामुळे मृत्यू झाला होता. मासे मृत झाल्याने जागोजागी खच पडला होता. याबाबतच्या तक्रारी महापालिका प्रशासनाकडे आल्यानंतर पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या भागात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली होती. या घटनेची गंभीर दखल घेऊन या प्रकरणाला जबाबदार असलेल्या चार अधिकाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर, संबंधित मुख्य अभियंत्याकडून या संदर्भात स्पष्टीकरण मागितले आहे.

या निष्काळजीपणाबद्दल मला दिसणार विभागाचे मुख्य अभियंता यांना खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यांचे स्पष्टीकरण असमाधानकारक आढळल्यास, त्यांच्यावर पुढील प्रशासकीय कारवाई केली जाईल, असे आयुक्तांनी काढलेल्या आदेशामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

### मुख्य अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस

» **महापालिकेच्या प्राथमिक तपासात तलावा जवळ उभारण्यात आलेले मैलापाणी प्रक्रीया प्रकल्प योग्य प्रकारे कार्यान्वित नसल्याचे आढळून आले. या केंद्रातून प्रक्रिया न केलेले मैलापाणी थेट पाषाण तलावात सोडण्यात येत असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे पुणे महापालिकेच्या मलनिःसारण व देखभाल दुरुस्ती विभागाच्या मुख्य अभियंता जगदीश खानोरे यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. त्यांच्याकडून खुलासा मागवण्यात आला आहे. हा खुलासा समाधानकारक नसेल तर पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.**

# शहराचा पाण्याचा कोटा वाढण्याची शक्यता

## थकबाकी एकरकमी भरण्याचा शासनाचा विचार; राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**


जलसंपदा विभाग आणि महापालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला पाणीपट्टीचा वाद आता संपुष्टात येण्याची चिन्हे आहेत. पालिकेकडील दंड आणि व्याजाची थकबाकी एकरकमी भरण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. तसेच शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहराचा पाणी कोटा वाढवून देण्यासही त्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची बैठक शुक्रवारी सिंचन भवनात पार पडली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. पुणे महापालिकेकडे मार्च अखेरपर्यंत पाणीपट्टीची साडेनऊशे कोटी रुपयांची थकबाकी होती. यावरून जलसंपदा विभागाने कठोर पवित्रा घेत पाणी तोडण्याचा इशारा दिला होता.

याबाबत विखे पाटील म्हणाले, कोल्हापूर, नाशिक, संभाजीनगर यांसारख्या शहरांनी पैसे भरण्यास सुरुवात केल्यानंतरच त्यांचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला. पुणे महापालिका याला अपवाद असणार नाही. नागरिकांकडून पाणीपट्टी वसूल करूनही पालिकेने जलसंपदा विभागाचे पैसे थकवले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, आयुक्तांशी चर्चा केल्यानंतर पालिकेने आता थकबाकीतील २५ कोटी रुपये जमा केल्याचेही त्यांनी नमूद केले.

कराराप्रमाणे पालिकेने १६ टीएमसी पाणी उचलणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात २२ टीएमसी पाणी उचलले जाते. या अतिरिक्त ६ टीएमसी पाण्यामुळे आणि सांडपाण्यावर पूर्णपणे प्रक्रिया न केल्यामुळे पालिकेला दंड आकारला जातो, असेही त्यांनी सांगितले. पुणे शहराची वाढती लोकसंख्या आणि विस्तार लक्षात घेता, जुना १८ टीएमसीचा पाणी कोटा अपुरा पडत असल्याचे विखे पाटील यांनी मान्य केले.

पाणीवापराचे नियोजन पालिकेने केले नाही तर त्याचा फटका पुणेकरांना बसणार आहे. त्यामुळे पाणीकपात करावी की नाही हे पालिकेनेच ठरवावे,असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. पाणी नियोजनाबाबत त्यांनी सांगितले की, पाणीकपातीचा मुद्दा हा जलसंपदा किंवा महापालिकेचा नाही. यावर्षी पाऊस कमी असल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभाग तसेच स्कायमेटने स्पष्ट केले आहे. यंदा अल निनोमुळे सरासरीच्या तुलनेत पाऊस कमी असेल, असा अंदाज आहे.त्यामुळे पाणीकपातीचा निर्णय पालिकेने घ्यायचा आहे. ३१ ऑगस्टपर्यंत किती पाणी उपलब्ध राहील, याची माहिती पालिकेला देण्यात येणार आहे. ही उपलब्धता लक्षात घेऊन नियोजन करावे लागणार आहे.



### अतिरिक्त पाणीउचल आणि दंडाचा मुद्दा

**» करारानुसार पुणे महापालिकेला १६ टीएमसी पाणी उचलण्याची परवानगी असताना प्रत्यक्षात सुमारे २२ टीएमसी पाणी उचलले जात असल्याचे विखे पाटील यांनी नमूद केले. या अतिरिक्त पाणीउचल आणि सांडपाण्याच्या अपुऱ्या प्रक्रियेमुळे पालिकेवर दंड आकारला जात आहे. वाढत्या शहरीकरणामुळे पाण्याची मागणी वाढत असून जुना कोटा अपुरा पडत असल्याची कबुलीही त्यांनी दिली.**

### राधाकृष्ण विखे पाटील यांचे वक्तव्य

**» जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, पुणे महापालिकेची पाणीपट्टी थकबाकी आणि त्यावरील दंड-व्याज एकरकमी भरण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. सध्या साडेनऊशे कोटी रुपयांची थकबाकी असून त्यातील काही रक्कम महापालिकेकडून जमा करण्यात आली आहे. इतर शहरांनी थकबाकी भरल्यानंतरच पाणीपुरवठा पूर्ववत केला गेला, त्यामुळे पुण्यासाठीही नियम समान राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.**

### नियोजनाची जबाबदारी महापालिकेवर

**» पाणीकपात करायची की नाही, याचा अंतिम निर्णय महापालिकेने घ्यायचा असल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले. अल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी राहण्याची शक्यता असल्याने धरणांमधील पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत टिकविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत योग्य नियोजन न केल्यास पुणेकरांना त्याचा फटका बसू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.**

# छगन भुजबळांचे हेलिकॉप्टर हेलिपॅडऐवजी कार पार्किंगमध्ये उतरवले, पायलटची गंभीर चूक

## पुरंदरच्या खानवडी येथे हेलिकॉप्टर हेलिपॅडऐवजी कार पार्किंगमध्ये उतरवण्यात आले, घटनेनंतर सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे एक धक्कादायक प्रकार घडला असून हेलिकॉप्टर लँडिंगदरम्यान मोठी चूक झाल्याची घटना समोर आली आहे. नियोजित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्याऐवजी पायलटने ते थेट कार पार्किंगच्या जागेत उतरवल्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

या हेलिकॉप्टरमध्ये सुनेत्रा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते. ते एका कार्यक्रमासाठी खानवडी येथे येत होते. हेलिकॉप्टरसाठी स्वतंत्र हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, लँडिंगच्या वेळी पायलटने चुकून कार पार्किंगच्या जागेत हेलिकॉप्टर उतरवले.

घटनेच्या वेळी सुदैवाने कोणतीही मोठी जीवितहानी झाली नाही. पार्किंगमध्ये काही वाहने उभी होती, मात्र कोणालाही गंभीर इजा झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. तरीही, पायलटकडून झालेली ही चूक गंभीर मानली जात आहे.

स्थानिक नागरिकांनी या घटनेनंतर नाराजी व्यक्त केली आहे. योग्य नियोजन असूनही अशा प्रकारे चुकीच्या ठिकाणी लँडिंग होणे धोकादायक आहे. विशेषतः लोकवस्तीच्या जवळ अशा प्रकारची चूक मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरू शकली असती, अशी भीती स्थानिकांकडून व्यक्त करण्यात आली.

प्रशासनाकडून या घटनेची चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. पायलटची चूक नेमकी कशामुळे झाली, हेलिपॅड स्पष्टपणे दिसत होते का किंवा तांत्रिक अडचण होती का, याचा तपास केला जाणार आहे.

या घटनेमुळे सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, भविष्यात अशा प्रकारच्या चुका टाळण्यासाठी अधिक दक्षता घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.



### चौकशीची शक्यता

**» पुणे जिल्ह्यातील खानवडी येथे हेलिकॉप्टर लँडिंगदरम्यान झालेल्या चुकीच्या घटनेत मंत्री छगन भुजबळ हे सुरक्षित राहिले. नियोजित हेलिपॅडऐवजी हेलिकॉप्टर कार पार्किंगमध्ये उतरवल्यामुळे काही काळ गोंधळ निर्माण झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त करत सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रशासनाकडून या प्रकरणाची चौकशी होण्याची शक्यता असून, पायलटची चूक नेमकी कशामुळे झाली याचा तपास केला जाणार आहे.**